# भारती विद्‍यापीठ
# स्कूल ऑफ परफॉर्मिंग आर्टस्, पुणे (भारत)

संगीत (गायन / स्वरवाद्‍य) अभ्यासक्रम

**प्राथमिक परीक्षा**

**एकूण गुण - ५०** **परीक्षेचा कालावधी - १५ मी.**

**किमान गुण - १८**

एकूण तास - ५०

## सैद्धांतिक : एकूण गुण - १५

या परीक्षेसाठी लेखी परीक्षा घेण्यात येणार नाही. सैद्धांतिक भाग प्रात्यक्षिक परीक्षेच्या वेळी विचारण्यात येईल.

१. व्याख्या - संगीत, अलंकार, सरगम गीत, राग, ताल.
२. अभ्यासक्रमातील रागांची माहिती. उदा- स्वर, वादी, संवादी, आरोह, अवरोह पकड, थाट, गायन समय.
३. तीनताल, केरवा, दादरा यांची माहिती आणि हातावर टाळी देऊन म्हणण्याची क्षमता

## प्रात्यक्षिक : एकूण गुण - ३५

१. खालील १० स्वरालंकारांचा अभ्यास.
   अ. सा रे ग म --------
   आ. सारे रेग -------
   इ. सारेग रेगम -------
   ई. सारेसा रेगरे -------
   उ. सारेगम रेगमप -------
   ऊ. सागरेसा रेमगरे -------
   ए. सारेगसा रेगमरे -------
   ऐ. साग रेम -------
   ऑ. सारेगमप रेगमपध -------
   ऑ. सारेसाग रेगरेम -------
२. खालील रागांपैकी कोणत्याही दोन रागांमध्ये सरगम गीत.
   यमन, भैरव, काफी, भूप, भीमपलास.
३. खालील प्रत्येक रागांमध्ये एक बंदिश. (छोटा ख्याल / गत)
   यमन, भैरव, काफी, भूप, भीमपलास.
४. स्वर समूहाच्या आधारे वर उल्लेखित राग ओळखण्याचा अभ्यास.

# भारती विद्यापीठ
# स्कूल ऑफ परफॉर्मिंग आर्टस्, पुणे (भारत)

संगीत (गायन / स्वरवाद्य) अभ्यासक्रम

**प्रमाणपत्र परीक्षा - भाग १**

**एकूण गुण - ७५** **परीक्षेचा कालावधी - २० मी.**

**किमान गुण - २७**

एकूण तास - ६०

**सैद्धांतिक :** **एकूण गुण - १५**

या परीक्षेसाठी लेखी परीक्षा घेण्यात येणार नाही. परंतु सैद्धांतिक विषयातील अभ्यासक्रम प्रात्यक्षिक परीक्षेत विचारण्यात येईल.

१. स्वरांची नावे उदा - षड्ज, रिषभ इत्यादी.

२. खालील शब्दांची व्याख्या,

सप्तक, अलंकार, आरोह, अवरोह, पकड, राग, जाती, थाट, नाद, ताल, लय(विलंबित, मध्य, द्रुत) सरगम गीत, लक्षण गीत, स्थायी, अंतरा इत्यादी.

३. अभ्यासक्रमातील रागांची माहिती. उदा- स्वर, वादी, संवादी, आरोह, अवरोह, पकड, थाट, गायन समय इत्यादी.

**प्रात्यक्षिक :** **एकूण गुण – ६०**

१. मागील परीक्षेतील कोणतेही अलंकार रागांमध्ये म्हणण्याची क्षमता.

२. कोमल, तीव्र स्वर गाण्याचा / वाजविण्याचा अभ्यास तसेच अलंकार गाताना उपयोग.

३. खालील प्रत्येक रागामध्ये एक बंदिश / गत आणि चार रागात ३ - ४ आलाप आणि तान.

यमन, बागेश्री, काफी, खमाज, भूप, देस

४. खालील रागांमध्ये दोन सरगम गीत आणि दोन लक्षण गीत.

(वाद्य वादनासाठी तंत्र अंगाची गत)

यमन, बागेश्री, काफी, खमाज, भूप, देस

५. ताल झपताल मध्ये एक बंदिश / गत.

६. एक भजन.

७. झपताल, एकताल यांची माहिती आणि हातावर टाळी देऊन म्हणण्याची क्षमता.

# भारती विद्यापीठ
# स्कूल ऑफ परफॉर्मिंग आर्टस्, पुणे (भारत)

संगीत (गायन / स्वरवाद्य) अभ्यासक्रम

**प्रमाणपत्र परीक्षा - भाग २**

**एकूण गुण - १२५**

एकूण तास - ६५

## सैद्धांतिक:

**एकूण गुण - ५०　　　　किमान गुण - १८　　　　परीक्षेचा कालावधी - २ तास**

या अभ्यासक्रमासाठी लेखी परीक्षा घेण्यात येईल.

१. "राग" व्याख्या आणि सविस्तर माहिती.

२. खालील संकल्पनांची माहिती,
श्रुती, स्वर (शुद्ध, कोमल, तीव्र), वादी, संवादी, अनुवादि, विवादी स्वर, गायन समय, गीताचे अवयव( स्थायी, अंतरा, संचारी, अभोग), वर्ण आणि त्याचे प्रकार, मींड, गमक, घसीट, लय आणि लयीचे प्रकार.

३. 'थाट' व्याख्या आणि माहिती.

४. 'ताल' व्याख्या आणि माहिती.

५. पं. भातखंडे आणि पं. पलुसकर स्वरलेखन पद्धतीची माहिती.

६. अभ्यासक्रमातील रागांमधील एक बंदिश / गत लिपीबद्ध करणे.

७. खालील रागांची शास्त्रीय माहिती.
वृन्दावनि सारंग, तिलक कामोद, जौनपुरी, मालकंस, केदार, अल्हैया बिलावल.

## प्रात्यक्षिक:

**एकूण गुण - ७५　　　　किमान गुण - २७　　　　परीक्षेचा कालावधी - २० मी.**

१. खालील अलंकारांचा अभ्यास -
अ. सागरेसा रेमगरे.........
आ. सारेगमगरे रेगमपमग .......
इ. सारेगरेगमगरे रेगमगमपमग........
ई. सागरेमगरे रेमगपमग.......

२. मागील परीक्षेतील रागांची उजळणी.

३. खालील कोणत्याही एका रागामध्ये बडाख्याल / विलंबित गत (फक्त बंदिश) आणि त्येक रागामध्ये एक बंदिश / गत ज्यातील कोणत्याही दोन रागांमधील बंदिशींवर पाच आलाप आणि ताना.

वृन्दावनि सारंग, तिलक कामोद, जौनपुरी, मालकंस, केदार, अल्हैया बिलावल.

४. रूपक मध्ये एक बंदिश / गत.

५. धृपद (बंदिश आणि दुगून)

६. वरील रागांमधील कोणत्याही एका रागात एक तराणा.

७. राग ओळखण्याची योग्यता.

८. रूपक, चौताल, धमार आणि विलंबित एकताल या तालांचा अभ्यास - हातावर टाळी देऊन एकपट, दुप्पट करणे.

# भारती विद्यापीठ
# स्कूल ऑफ परफॉर्मिंग आर्टस्, पुणे (भारत)

संगीत (गायन / स्वरवाद्य) अभ्यासक्रम

**उच्च प्रमाणपत्र परीक्षा - भाग १**

**एकूण गुण - २००**

एकूण तास - ७०

## सैद्धांतिक:

**एकूण गुण - ७५** **किमान गुण - २७** **परीक्षेचा कालावधी - ३ तास**

या अभ्यासक्रमासाठी लेखी परीक्षा घेण्यात येईल.

१. मागील सर्व व्याख्यांची विस्तृत माहिती तसेच खालील संकल्पनांची विस्तृत माहिती.
नाद आणि नादाचे गुणधर्म, श्रुती - स्वर विभाजन, आलाप, तान, तानांचे प्रकार.

२. 'जाती' - व्याख्या आणि प्रकार. (ओडव, षाडव, संपूर्ण).

३. राग आणि थाटाचे नियम.

४. १० थाटांची माहिती.

५. माहिती - ख्याल, बंदिश, सरगम गीत, लक्षण गीत, तराणा, धृपद, धमार,

६. अभ्यासक्रमातील रागाची बंदिश / गत आलाप आणि तानांसह लिपीबद्ध करणे.

७. सांगीतीक योगदान,
पं. भातखंडे, पं. विष्णू दिगंबर पलुसकर, पं. बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर, पं. रवीशंकर.

## प्रात्यक्षिक:

**एकूण गुण - १२५** **किमान गुण - ४४** **परीक्षेचा कालावधी - २५ मी.**

१. खालील पैकी कोणत्याही तीन रागात बडा ख्याल / मसितखानी गत आणि द्रुत बंदिश / रजाखानी गत सहा आलाप तानांसह.
यमन, बिहाग, भूप, बागेश्री, भीमपलास.

२. खालील सर्व रागांमध्ये आलाप तानांसह द्रुत बंदिश / गत.
हमीर, पटदीप, वृन्दावनी सारंग, देस, तिलंग, देशकार.

३. एक तराणा (वाद्य वादनासाठी तंत्र अंगाची गत)

४. एक धृपद आणि धमार (वाद्य वादनासाठी वेगळ्या तालामधील दोन बंदिशी)

५. एक लोकगीत अथवा भजन / धून.

६. खालील तालांचा संपूर्ण अभ्यास तसेच हातावर टाळी धरून दुगून करण्याची क्षमता
झुमरा, तिलावाडा, सुलताल.

७. अभ्यासक्रमातील सर्व रागांचा शास्त्रीय अभ्यास.

# भारती विद्‌यापीठ
# स्कूल ऑफ परफॉर्मिंग आर्टस्, पुणे (भारत)

संगीत (गायन / स्वरवाद्‌य) अभ्यासक्रम

**उच्च प्रमाणपत्र परीक्षा - भाग २**

**एकूण गुण - २५०**

एकूण तास - ७०

## सैद्धांतिक:

**एकूण गुण - १००** **किमान गुण - ३५** **परीक्षेचा कालावधी - ३ तास**

या अभ्यासक्रमासाठी लेखी परीक्षा घेण्यात येईल.

१. मागील वर्षात उल्लेखित सर्व शब्दांची माहिति तसेच खालील शब्दांची माहिती,
श्रुती, कण स्वर, गमक, अध्वदर्शक स्वर, समप्रकृतिक राग, जाती गायनाची लक्षणे, प्रबंध, वस्तू.

२. राग समय चक्राची माहिती.

३. अभ्यासक्रमातील रागांच्या बंदिशी आणि आलाप व तान स्वरलिपीबद्ध करणे,

४. खालील तालांची एकपट, दुप्पट, चौपट पं. भातखंडे आणि पं. पलुस्कर स्वरालीपित लिपीबद्ध करणे,
तीनताल, झपताल, एकताल, झुमरा, चौताल, रूपक.

५. गायक- वादकांचे गुण –दोष.

६. भरत द्‌वारे श्रुती - स्वर विभाजन.

७. सांगीतीक योगदान,
गोपालनायक, मानसिंग तोमर, तानसेन.

८. निबंध लेखन - जीवनात संगीताचे महत्व, शास्त्रीय संगीत व लोक संगीत,

९. अभ्यासक्रमातील रागांचा शास्त्रीय अभ्यास,

## प्रात्यक्षिक:

**एकूण गुण - १५०** **किमान गुण - ५३** **परीक्षेचा कालावधी - २५ मी.**

१. खालील रागांपैकी कोणत्याही चार रागांमध्ये आठ आलाप, बोल, आणि तानांसह बडाख्याल / मसितखानी गत आणि द्रुत बंदिश / रजाखानी गत.
भैरव, मालकंस, भीमपलास, हमीर, केदार, वृन्दावनी सारंग

२. खालील रागांमध्ये आलाप, बोल, आणि तानांसह द्रुत बंदिश / गत.
कामोद, गौड सारंग, जयजयवंती, पुरिया धनाश्री, शंकरा.

३. वरील उल्लेखित रागांमध्ये दोन तराणे / तंत्र अंगाची गत.

४. वरील कोणत्याही एका रागात एक धृपद आणि त्याची एकपट, दुप्पट आणि चौपट.

५. खालील उप - शास्त्रीय प्रकारांपैकी कोणतेही एक सादर करणे.

उदा:- दादरा, चैती, कजरी, नाट्य गीत, सुगम गीत.

६. स्वतः तानपुरा लाऊन त्या आधारे गायन / वादन सादर करण्याचा अभ्यास.

७. ताल दीपचंदी आणि रूपक या तालांचा अभ्यास (दुप्पट, चौपट) तसेच मागील अभ्यासक्रमातील सर्व तालांचा अभ्यास.

# भारती विद्‍यापीठ
# स्कूल ऑफ परफॉर्मिंग आर्टस्, पुणे (भारत)

संगीत (गायन / स्वरवाद्‍य) अभ्यासक्रम

**पदविका परीक्षा - भाग १**

**एकूण गुण - ४००**

एकूण तास - ७०

## सैद्धांतिक:

**एकूण गुण - १५० किमान गुण - ३० / प्रश्नपत्र परीक्षेचा कालावधी - ३ तास / प्रश्नपत्र**

या अभ्यासक्रमात सैद्धांतिक विषयासाठी दोन लेखी प्रश्नपत्र असतील.

**<u>प्रश्नपत्र - १</u>** **एकूण गुण - ७५**

१. भारतीय संगीताचा संक्षिप्त इतिहास.
२. जाती गायनाची विस्तृत माहिती.
३. धृपद आणि त्याच्या विविध बानी तसेच धमार यांची माहिती.
४. ख्याल, ठुमरी, टप्पा या प्रकारांची माहिती.
५. तान आणि त्याचे विविध प्रकार.
६. पं. व्यंकटमखी यांचा ७२ थाट सिद्धांत.
७. अभ्यासक्रमातील रागांच्या बंदिशी / गत, दोन आलाप आणि तान पं. भातखंडे आणि पं. पलुसकर स्वरलेखन पद्धतीत लिहिण्याची क्षमता.
८. या परीक्षेपर्यंतच्या अभ्यासक्रमातील सर्व ताल आणि त्यांच्या ठेक्याची दुप्पट, तिप्पट, चौपट लिहिण्याची क्षमता.

**<u>प्रश्नपत्र - २</u>** **एकूण गुण - ७५**

१. गायन, वादनातील घराणी आणि त्यातील कलाकारांची माहिती.
२. राग वर्गीकरण पद्धती.
३. संगीत आणि इतर कलांचा संबंध.
४. संगीतात भाषेचे महत्व.
५. स्वरलिपी पद्धतीचा संक्षिप्त इतिहास.
६. राग समयचक्राची विस्तृत माहिती.
७. अभ्यासक्रमातील रागांचा शास्त्रीय अभ्यास.
८. वाद्‍य वर्गीकरण.

**प्रात्यक्षिक :**

**एकूण गुण - २५०** **किमान गुण - १००** **परीक्षेचा कालावधी - ३० मी.**

**अ. रंगमंच सादरीकरण -** **एकूण गुण - ७५**

अभ्यासक्रमातील कोणत्याही एका रागात बडाख्याल / विलंबित गत आणि द्रुत बंदिश / गत विस्तारासह. (प्रात्यक्षिक परीक्षेत गायलेल्या रागाव्यातिरिक्त)

**आ. प्रात्यक्षिक परीक्षा -** **एकूण गुण - १७५**

१. खालील रागांपैकी कोणत्याही चार रागांमध्ये आलाप, बोल, आणि तानांसह बडाख्याल / मसितखानी गत आणि द्रुत बंदिश / रजाखानी गत
   पुरिया धनाश्री, जयजयवंती, कामोद, बागेश्री, गौड सारंग, शंकरा.

२. खालील प्रत्येक रागामध्ये आलाप, बोल, आणि तानांसह द्रुत बंदिश / द्रुत गत.
   बहार, बसंत, मुलतानी, मारवा, मिया मल्हार, शुद्ध कल्याण.

३. वरील उल्लेखित कोणत्याही एका रागात चतरंग. (वाद्यांसाठी अनवट तालात आलाप तानांसह गत वाजविणे.)

४. धमार / आडाचौताल मध्ये गत विस्तारासह.

५. एक तराणा / झपताल मध्ये गत.

६. एक उपशास्त्रीय प्रकार.

७. ताल ओळखण्याची क्षमता तसेच आडाचौताल आणि चाचर या तालांची दुप्पट, चौपट.

# भारती विद्यापीठ
# स्कूल ऑफ परफॉर्मिंग आर्टस्, पुणे (भारत)

संगीत (गायन / स्वरवाद्य) अभ्यासक्रम

**पदविका परीक्षा - भाग २**

**एकूण गुण - ४००**

एकूण तास - ७०

## सैद्धांतिक :

**एकूण गुण - १५० किमान गुण - ३० / प्रश्नपत्र परीक्षेचा कालावधी - ३ तास / प्रश्नपत्र**

या अभ्यासक्रमात सैद्धांतिक विषयासाठी दोन लेखी प्रश्नपत्र असतील.

**प्रश्नपत्र - १** **एकूण गुण - ७५**

१. श्रुती विभाजन.
२. षड्ज - पंचम आणि षड्ज - मध्यम भाव याची माहिती.
३. भरत आणि शारंगदेव द्वारे करण्यात आलेल्या सारणा चतुष्टी बद्दल माहिती.
४. मार्गी आणि देशी संगीत, कुतप यांची माहिती.
५. संगीतात तालवाद्याचे महत्व.
६. आधुनिक आणि मध्यकाळातील स्वर स्थापना.
७. पदविका परीक्षा - २ पर्यंतच्या अभ्यासक्रमातील रागांची संपूर्ण माहिती तसेच त्यामधील साम्य व भेद यांचा अभ्यास.
८. स्वर सप्तकाचा विकास.

**प्रश्नपत्र - २** **एकूण गुण - ७५**

१. योग आणि संगीत - प्राणायाम आणि त्याचे महत्व, आसने, मुद्रा बसण्याची पद्धती इ.
२. कलावंत, पंडित, वाग्ग्येयकार, गमाकेचे प्रकार यांची माहिती.
३. शुद्ध, छायालग, परमेल प्रवेशक राग, संधीप्रकाश राग.
४. खालील ग्रंथांचा संक्षिप्त अभ्यास,
   क्रमिक पुस्तक मालिका, राग विज्ञान.
५. निबंध लेखन.
   राग आणि रस
   थाट पद्धती (प्राचीन आणि नवीन)
   मंच प्रदर्शन
   संगीत शिक्षण पद्धती आणि वर्तमान समस्या
   हवेली संगीत
६. पाश्च्यात्य संगीत आणि कर्नाटक संगीताची माहिती.
७. भरत, मतंग, शारंगदेव यांचे योगदान.
८. प्राचीन प्रबंध गायन पद्धती, त्याचे नियम आणि प्रकार.

**प्रात्यक्षिक :**

**एकूण गुण - २५०** **किमान गुण - १००** **परीक्षेचा कालावधी - ३० मी.**

**अ. रंगमंच सादरीकरण -** **एकूण गुण - ७५**

अभ्यासक्रमातील कोणत्याही एका रागात बडाख्याल / विलंबित गत आणि द्रुत बंदिश / द्रुत गत विस्तारासह. (प्रात्यक्षिक परीक्षेत गायलेल्या रागाव्यातिरिक्त)

**आ. प्रात्यक्षिक परीक्षा -** **एकूण गुण - १७५**

१. खालील रागांपैकी कोणत्याही चार रागांमध्ये विस्तारासह बडाख्याल / विलंबित गत. ज्यापैकी एक ख्याल / गत ताल झुमरा मध्ये, एक ख्याल / गत ताल तिलवाडा आणि एक ख्याल / गत एकताल मध्ये. (वाद्यांसाठी ख्याल पद्धतीने वाजवीत नसल्यास आलाप, जोड इत्यादी वाद्याच्या अंगाने विस्तार करून विलंबित तीनताल आणि झपतालात गत वाजविणे) आणि द्रुत बंदिश / गत.
पुरिया, गौड मल्हार, मधुवंती, मियां कि तोडी, शुद्ध कल्याण, मियां मल्हार.

२. खालील रागांमध्ये आलाप, बोल, आणि तानांसह द्रुत बंदिश / गत.
पुरिया, हिंडोल, बसंत, दुर्गा, विभास, ललत, मारू बिहाग

3. एक तराणा / मत्ततालात गत.

4. एक ठुमरी.

5. अभ्यासक्रमातील कोणत्याही एका रागात त्रीवट / वेगळ्या तालात गत

6. अभ्यासक्रमातील रागांचा शास्त्रीय अभ्यास.

7. या परीक्षेपर्यंतच्या सर्व तालांचा अभ्यास तसेच दुप्पट, तिप्पट आणि चौपट करण्याची क्षमता.

# भारती विद्यापीठ
# स्कूल ऑफ परफॉर्मिंग आर्टस्, पुणे (भारत)

संगीत (गायन / स्वरवाद्य) अभ्यासक्रम

**उच्च पदविका परीक्षा - भाग १**

**एकूण गुण - ५००**

एकून तास - ८०

## सैद्धांतिक :

**एकूण गुण - २००  किमान गुण - ४० / प्रश्नपत्र  परीक्षेचा कालावधी - ३ तास / प्रश्नपत्र**

या अभ्यासक्रमात सैद्धांतिक विषयासाठी दोन लेखी प्रश्नपत्र असतील.

**प्रश्नपत्र - १** **एकूण गुण - १००**

१. स्वर शास्त्र - लांबी आणि कंपनसंख्या याचे गुणोत्तर व संबंध.
२. नवीन बंदिश / गत रचना करण्याची क्षमता.
३. लोक संगीत याबद्दल सविस्तर माहिती तसेच महाराष्ट्रातील लोक संगीताचा विस्तृत अभ्यास.
४. संगीताची उत्पत्ती आणि विकास या संदर्भात भारतीय आणि पश्चिमी मत.
५. राग वर्गीकरणाच्या विविध पद्धती.
६. अभ्यासक्रमातील सर्व रागांचा शास्त्रीय अभ्यास, समप्रकृतिक रागांशी तुलना.
७. पाश्च्यात्य स्वरलिपी पद्धतीचा अभ्यास.
८. अभ्यासक्रमातील रागांच्या बंदिशी / गत आलाप, तान आणि तीहाई लिपीबद्ध करणे.

**प्रश्नपत्र - २** **एकूण गुण - १००**

१. भरत आणि शारंगदेव कालीन संगीताची संपूर्ण माहिती.
२. उपयोजित संगीत.
३. भारतीय संगीताचा १९ वे शतक ते २१ वे शतक या कालखंडातील इतिहास.
४. भारतीय चित्रपट संगीत आणि संगीत दिग्दर्शक यांची माहिती.
५. रस - व्याख्या, रसाचे प्रकार, संगीतात रसाचे महत्व, स्वर - रस, लय - रस, राग - रस, छंद - रस यांचे विश्लेषण.
६. सौंदर्यशास्त्राची व्याख्या आणि संगीतात सौंदर्य निर्मिती करणारे घटक.
७. चरित्र,
सदारंग, अदारंग, उ. अब्दुल करीम खान, पं. रवीशंकर, पं. भीमसेन जोशी, पं. शिवकुमार शर्मा.

**प्रात्यक्षिक :**

**एकूण गुण - ३००** **किमान गुण - १२०** **परीक्षेचा कालावधी - ४० मी.**

**१. रंगमंच सादरीकरण** **एकूण गुण - १००**

अ. अभ्यासक्रमातील एका रागात गायन/ वादन ज्यामध्ये विलंबित आणि द्रुत बंदिश / गत आणि विशिष्ट गायकीचा / वादन शैलीचा अभ्यास. (प्रात्यक्षिक परीक्षेत गायलेल्या रागाव्यातिरिक्त) एकूण गुण - ८०

आ. उप-शास्त्रीय. एकूण गुण - २०

**२. प्रात्यक्षिक परीक्षा** **एकूण गुण - २००**

अ. खालील रागांचा सविस्तर अभ्यास आणि कोणत्याही पाच रागांमध्ये बडाख्याल / मसितखानी गत आणि द्रुत बंदिश / रजाखानी गत विस्तारासह. एक ख्याल / गत रूपक मध्ये आणि एक झपताल मध्ये.
श्याम कल्याण, शुद्ध सारंग, अहिर भैरव, मेघ / मेघ मल्हार, मारवा, रागेश्री, पूर्वी.

आ. खालील रागांचा संक्षिप्त अभ्यास (विस्तारासह).
किरवाणी, मधुवंती, कलावती, चंद्रकौंस, बिलासखानी तोडी, बिहागडा, जोग.

इ. वरील उल्लेखित कोणत्याही एका रागात त्रीवट.(वाद्यासाठी तंत्र अंगाची गत.)

ई. अभ्यासक्रमातील दोन रागांमध्ये तराणे / वाद्य वादनासाठी वेगळ्या तालात दोन गत.

उ. गायन / वादनात विविध तिहाइंचा वापर.

ऊ. अभ्यासक्रमातील रागांचा शास्त्रीय अभ्यास.

ऋ. अभ्यासक्रमातील रागांच्या जवळील रागांचा अभ्यास.

# भारती विद्यापीठ
# स्कूल ऑफ परफॉर्मिंग आर्टस्, पुणे (भारत)

संगीत (गायन / स्वरवाद्य) अभ्यासक्रम

**उच्च पदविका परीक्षा - भाग २**

**एकूण गुण - ५००**

एकूण तास - ८०

## सैद्धांतिक :

**एकूण गुण - २००    किमान गुण - ४० / प्रश्नपत्र    परीक्षेचा कालावधी - ३ तास / प्रश्नपत्र**

या अभ्यासक्रमात सैद्धांतिक विषयासाठी दोन लेखी प्रश्नपत्र असतील.

**प्रश्नपत्र - १** **एकूण गुण - १००**

१. अभ्यासक्रमातील सर्व रागांचा शास्त्रीय अभ्यास तसेच मागिल सर्व रागांशी साम्य व भेद याचा अभ्यास.
२. भरताच्या नाट्यशास्त्रची विस्तृत माहिती.
३. संगीत रत्नाकरची विस्तृत माहिती.
४. ध्वनी शास्त्र, रंगमंच ध्वनी व्यवस्था.
५. आवाज साधना.
६. अभ्यासक्रमातील रागांच्या बंदिशी / गत, आलाप, तान आणि तिहाई लिपीबद्ध करणे.
७. अभ्यासक्रमातील विविध तालांची आड, बिआड, कुआड लिपीबद्ध करण्याची क्षमता तसेच समान मात्रासंख्या असलेल्या तालांचा तुलनात्मक अभ्यास.
८. निबद्ध गान आणि त्याचे विविध प्रकार तसेच तंतू वाद्याच्या विविध रचनांचे विस्तृत विश्लेषण.

**प्रश्नपत्र - २** **एकूण गुण - १००**

१. उत्तर भारतीय आणि कर्नाटक संगीताची तुलना तसेच त्यातील प्रबंध प्रकारांची माहिती.
२. भारतीय वाद्यांचे प्राचीन वर्गीकरण तसेच खालील वाद्यांची माहिती.
   मृदंग, हुडूक्का, विपंची, किन्नरी, वंशी.
३. नवराग निर्मितीचे सिद्धांत.
४. गुरु - शिष्य परंपरा.
५. संगीत विषयक लेखन - समीक्षा, वृत्तपत्रीय लेखन, चरित्र लेखन इ.

६. संगीत रचनेचे तत्व - स्वरसंगती, लय, छंद, काव्यार्थ, भाषा, उपयुक्त वाद्ये इत्यादीचे विवेचन.

७. भारतीय संगीतात साथ संगतीचे महत्व आणि संगतकारांची मनोभूमिका.

**प्रात्यक्षिक :**

**एकूण गुण - ३००** **किमान गुण - १२०** **परीक्षेचा कालावधी - ४० मी.**

**१. रंगमंच सादरीकरण** **एकूण गुण - १००**

अ. अभ्यासक्रमातील एका रागात गायन/ वादन ज्यामध्ये विलंबित आणि द्रुत बंदिश/ गत आणि विशिष्ट गायकीचा / वादन शैलीचा अभ्यास. (प्रात्यक्षिक परीक्षेत गायलेल्या रागाव्यातिरिक्त) एकूण गुण - ८०

आ. उप - शास्त्रीय एकूण गुण - २०

**२. प्रात्यक्षिक परीक्षा** **एकूण गुण - २००**

अ. खालील रागांचा सविस्तर अभ्यास आणि कोणत्याही पाच रागांमध्ये बडाख्याल / मसितखानी गत आणि द्रुत बंदिश / रजाखानि गत विस्तारासह ज्यापैकी एक ख्याल / गत आडाचौतालात तसेच विशिष्ट गायकी आणि वादन शैलीचा अभ्यास.

बैरागी, बिलासखानी तोडी, कोमल रिषभ आसावरी, जोग, दरबारी कान्हडा, छायानट, नट भैरव.

आ. खालील रागांचा संक्षिप्त अभ्यास (विस्तारासह)
भूपाल तोडी, नंद, शंकरा, हंसध्वनी, हिंडोल, नायकी कान्हडा, श्री.

इ. टप्पा गायन.(वाद्यांसाठी टप्पा अंगाने वादन)

ई. अभ्यासक्रमातील रागात परीक्षकांच्या म्हणण्यावरून सरगम गीत / बंदिश रचणे.

उ. दोन तराणे / अनवट तालांमध्ये दोन गत.

ऊ. अभ्यासक्रमातील विविध तालांची आड, बिआड, कुआड म्हणण्याची क्षमता.